| | | |
|---|---|---|
| सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | महाराष्ट्र शासन पोलीस विभाग | |

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, मुंबई

वरळी पोलीस ठाणे इमारत, दुसरा मजला, डॉ. ॲनी बेझेंट रोड, वरळी, मुंबई. ४०० ०३०

दुरध्वनी क्र. ०२२-२४९३१७७३. Email id – dcpzone3-.mum@mahapolice.gov.in

दिनांक :- ०६/०१/२०२५

# प्रेस नोट

**आग्रीपाडा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २९/१२/२०२४ रोजी ‘‘ रिषभ ज्वेलर्स ’’ या सोन्या-चांदीच्या दुकानात दुपारी १५.३० वा. ते १६.०० वा. दरम्यान २ अनोखळी इसमांनी चाकु व बंदुकीचा धाक दाखवून दुकान मालक व नोकर यांचे हातपाय बांधून व धमकावून दुकानातील अंदाजे २४५८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे विविध दागिने तसेच २२०० ग्रॅम वजनाचे विविध प्रकारचे चांदिचे दागिने व रोख रक्कम रू. १५,०००/- अशी मालमत्ता जबरी चोरी करून फरार झालेबाबत आग्रीपाडा पोलीस ठाणेस फिर्यादी प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.**

| | |
|---|---|
| पोलीस ठाणे | आग्रीपाडा पोलीस ठाणे, मुंबई |
| गुन्हा नोंद क्र. व कलम | ६४८/२०२४ कलम ३०९(४), ३०९(६), ३३३,१२७(२),३११, ३(५) भा.न्या.सं. २०२३ सह कलम ३, ४, २५ भारतीय शस्त्र अधिनियम |
| गुन्हा घडला दिनांक व वेळ | दिनांक २९/१२/२०२४ रोजी १५.३० वा. ते १६.०० वाजताचे दरम्यान |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक २९/१२/२०२४ रोजी २१:३५ वा. |
| गुन्हयाचे ठिकाण | रिषभ ज्वेलर्स, लक्ष्मीदास वाडी, साने गुरूजी मार्ग, सातरस्ता, मुंबई |
| फिर्यादीचे नांव व पत्ता | श्री भवरलाल जैन, वय ५० वर्षे |
| अटक आरोपींची संख्या | १) संतोषकुमार लालताप्रसाद बुलकिया, वय २६ वर्षे राठि:- कटरा समथर, झाशी, उत्तर प्रदेश<br>२) विनोद लखन पाल, २५ वर्षे राठि :- पुरकला, ललीतपुर, उत्तरप्रदेश |
| गुन्हयाची कार्यपध्दती | **सोन्याच्या दुकानात प्रवेश करून बंदुकीचा व चाकुचा धाक दाखवुन जबरी चोरी** |

दिनांक २९/१२/२०२४ रोजी आग्रीपाडा पोलीस ठाणे हद्दीतील ‘‘ रिषभ ज्वेलर्स ’’ लक्ष्मीदास वाडी, साने गुरूजी मार्ग, सातरस्ता, मुंबई येथील सोन्या-चांदीच्या दुकानात दुपारी १५.३० वा. ते १६.०० वा. दरम्यान २ अनोळखी इसमांनी सोन्याच्या दुकानांत घुसून चाकु व बंदुकीचा धाक दाखवून सदर ज्वेलर्स दुकानातील मालक श्री भवरलाल जैन ५० वर्षे तसेच तेथील नोकर पुरणकुमार ओबाराम देसाई वय १९ वर्षे यांचे हातपाय बांधून व धमकावून दुकानातील अंदाजे २४५८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे विविध दागिने तसेच २२०० ग्रॅम वजनाचे विविध प्रकारचे चांदिचे दागिने व रोख रक्कम रू. १५,०००/- अशी मालमत्ता जबरी चोरी करून निघून गेले. गुन्हा दाखल झालेनंतर वर नमुद गुन्हयाचे तपासाच्या अनुषंगाने मा. सत्यनारायण चौधरी, पोलीस सह आयुक्त, मा. अनिल पारसकर, अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, मुंबई, मा. शंकर चिंदरकर, सहायक पोलीस आयुक्त, आग्रीपाडा विभाग मुंबई, मा. संजय निंबाळकर, व.पो.नि. आग्रीपाडा पोलीस ठाणे यांनी घटनास्थळावर तात्काळ भेट दिली. तसेच अंगुलीमुद्रा विभाग, गु.अ.वि. मुंबई सपोनी फाटे,व श्वान पथकास पाचारण करण्यात आले.

**<u>चोरी करणाऱ्या अज्ञात इसमांचे वर्णन खालील प्रमाणे :-</u>**

१) बंदुक दाखवणाऱ्या इसमाचे वर्णन- वय अंदाजे २५ ते ३० वर्षे, उंची साधारण ५ फुट ६ इंच अंदाजे,

२) चाकु दाखवणाऱ्या इसमांचे वर्णन- वय अंदाजे २५ ते ३० वर्षे, उंची साधारण ५ फुट २ इंच अंदाजे,

वर नमुद गुन्हयाचे तपासाच्या अनुषंगाने मा. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री सत्यनारायण चौधरी, पोलीस सह आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री अनिल पारसकर, अपर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. श्री दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, मुंबई यांनी मध्य प्रादेशिक विभागातील सर्व गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांना बोलावून त्यांची वेगवेगळया तपासी पथके तयार केली. सर्व तपासी पथकांना मार्गदर्शन करून विविध ठिकाणी मिळालेल्या माहितीच्या व तांत्रीक माहितीच्या आधारावर रवाना करण्यात आले.

सदरची बाब मा. पोलीस उप आयुक्त, श्री दत्तात्रय कांबळे यांनी अतिशय गांभिर्याने घेवून मा. शंकर चिंदरकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, आग्रीपाडा विभाग, मुंबई व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय निबांळकर तसेच तपास अधिकारी श्री संदिप फणसे यांनी सलग ७२ तास सचोटीने नमुद पथकांना सतत मार्गदर्शन करून पाठपुरावा केला.

आरोपीताच्या संभाषनावरून आरोपी कोणत्या प्रांतातील असावेत याबाबत अनुमान काढले. सी.सी.टि.व्ही. च्या आधारे आरोपी निघुन जात असलेल्या मार्गबाबत माहिती प्राप्त केली. त्याचदरम्यान घटनास्थळावरून प्राप्त आरोपीचे फिंगरप्रिंट वरुन गुन्हयातील संशयीत पाहिजे आरोपीबाबत माहिती प्राप्त झाली. गुन्हयाच्या तांत्रिक तपासामध्ये आरोपी हे उत्तरप्रदेश राज्यात झांशी येथील चिरगांव पोलीस ठाणे अंतर्गत परिसरात लपून बसल्याची खात्रीशीर माहिती उपलब्ध झाल्याने तपास पथकास उत्तर प्रदेश येथे रवाना करून वेळोवेळी मार्गदर्शन व पुढील कार्यवाहीबाबत अवगत करण्यात येत होते. राजस्थान येथे रवाना झालेल्या पथकास उत्तरप्रदेश येथे बोलावून स्थानिक पोलीसांच्या मदतीने या गुन्हयातील मुख्य आरोपी नामे संतोषकुमार लालताप्रसाद बुलकिया, वय २६ वर्षे यास मुद्देमालासह पळून जात असताना त्याच्या राहत्या घराचे परिसरात ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीची खात्री करून त्यास दिनांक ०२/०१/२०२५ रोजी स्थानिक पोलीस ठाणेस चिरगांव, झाशी येथे अटक करण्यात आली.

नमुद आरोपी संतोषकुमार लालताप्रसाद बुलकिया वय २६ वर्षे याचेकडे चौकशी केली असता तो कटरा समथर, झाशी, उत्तर प्रदेश राज्य येथील मुळ रहिवाशी असल्याचे सांगून तो मागील ६ वर्षापासून मुंब्रा देवी कॉलनी, दिवा पूर्व, जि. ठाणे येथे भाडयाचे रूमवर राहण्यास आहे. तो उपजिविकेसाठी मुंबईत विविध परिसरात दारोदारी फिरून काचेच्या बांगडया विक्रीचा व्यवसाय करत असल्याचे सांगितले. तसेच तो एका गुन्हयात झाशी जेलमध्ये असताना आरोपी नामे विनोद लखन पाल याची ओळख व त्यानंतर मैत्री झाल्याचे सांगितले. तो जामीनावर असताना मुंबईत आला व त्याने बांगडी विक्री व्यवसायाच्या बहाण्याने सातरस्ता परिसरातील ज्वेलर्स दुकानावर पाळत ठेवून रिषभ ज्वेलर्स येथे रविवारी सुट्टीच्या दिवशी दुपारी सदर दुकानात वर्दळ कमी असल्याचे व तेथे दुपारच्या वेळी फक्त मालक व १ नोकर असल्याची माहिती काढली. सदर बाबत त्याने त्याचा साथीदार विनोद लखन पाल यास माहिती दिली असता त्यांनी सदर ज्वेलर्स दुकान लुटण्याची योजना आखली व त्यासाठी लागणारे बंदूक व चाकू त्याचे मुळ गावी जावून मुंबईत घेवून आले.

त्यानंतर रविवारी दिनांक २९/१२/२०२४ रोजी त्याने विनोद पाल याच्या मदतीने ज्वेलर्स दुकानात चोरी करून मुळ गांवी पळून आल्याची माहिती दिली. त्याचे साथीदारबाबत विचारणा केली असता विनोल लखन पाल हा <u>ललीतपुर याठिकाणी</u> गेल्याचे सांगितले. त्याचा शोध घेण्यासाठी आग्रीपाडा पोलीस ठाणेचे दुसरे पथक ललीतपूर,उत्तरप्रदेश येथे रवाना करून शोध घेण्यात येत होता. दिनांक ०२/०१/२०२५ रोजी आरोपी विनोद लखन पाल, २५ वर्षे यास गुन्हे शाखा, मुंबई यांनी ताब्यात घेवून आग्रीपाडा पोलीस ठाणेचे पथकाच्या ताब्यात दिल्याने त्यास चिरगांव पोलीस ठाणे येथे दिनांक ०२/०१/२०२५ रोजी अटक करण्यात आली.

**हस्तगत मालमत्ता :- गुन्हयात वापरण्यात आलेली बंदुक व सोन्या-चांदीचे काही दागीने**

नमुद आरोपीतांचा पुर्वअभिलेख पडताळला असता खालील नमुद प्रमाणे आरोपीवर विविध गुन्हे असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**<u>आरोपी नामे १) संतोषकुमार लालताप्रसाद बुलकिया वय २६ वर्षे राठि :- कटरा समथर, झाशी, उत्तर प्रदेश</u>**

१) शिप्रीबाजार पोलीस ठाणे, झाशी, उत्तरप्रदेश गु.नों.क्र ३८९/२०२२ कलम ३८७, ३०७ भादंविसं

**आरोपी नामे २) <u>विनोद लखन पाल, २५ वर्षे राठि :- पुरकला, ललीतपुर, उत्तरप्रदेश.</u>**

१) बिजावर पोलीस ठाणे, मध्यप्रदेश राज्य गु.नों.क्र. २८/२०२४ कलम २९४,३२३, ४५८,५०६,३४ भादंविसं
२) सिव्हील लाईन पोलीस ठाणे, मध्यप्रदेश राज्य गु.नों.क्र. ९१३/२०२३ कलम ३९४,३९७,४११ भादंविसं
३) टि.टि.नगर पोलीस ठाणे, गु.नों.क्र. ४३/२०१९ कलम ३५४,३५४(अ),३५४(क),३५४ (ड) भादंविसं सह ३(१२) एस.सी.एस.टी. ॲक्ट

या कामी कार्यरत असणारी मध्य प्रदेश व उत्तर प्रदेश व राजस्थान व महाराष्ट्र पथकातील अधिकारी श्री नवनाथ चौधरी, तसेच गुन्हे शाखेचे सपोनि मुजावर, आग्रीपाडा पोलीस ठाणेचे स.पो.नि. श्री रविकांत नंदनवार, श्री अजय भोसले, श्री दत्तात्रय गुरव, श्री प्रकाश सुतार,श्री सचिन माने, श्री जोष्टे, पोउपनि श्री उमेश करंजावणे, श्री स्वप्नील खोंडे, श्री प्रकाश काळे, श्रीमती प्रतिमा पवार, श्री पाटील, श्री घाग, श्री काकळीज, श्री खैरावकर, श्री पायघन, श्री संजयकुमार कांबळी तसेच पो.ह. अविनाश चव्हाण, मोरे, फड, पो.शि. केदार, नासीर शेख, शिंदे, रणदिवे, बोरसे, अपसुंदे, दिवटे व समीर खरात, म.पो.शि. देसाई, इंदलकर यांनी परराज्यात जावुन अथक परिश्रम व कौशल्य पणाला लावून झांशी, उत्तर प्रदेश येथून गुन्हयातील आरोपी ताब्यात घेवून आरोपीतांस अटक केली आहे.

***

** **Z3/01/2025** **